IMPACT FACTOR: 3.012 (IIJIF) ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

VOL. - 2 SPECIAL ISSUE - 1 NOVEMBER 2016

A Bimonthly Refereed International Journal

Special Issue On

# UNDERSTANDING THE CONSTITUTION OF INDIA



Chief Editors

PRIN. DR R.T.BEDRE

PRIN. DR T. L. HOLAMBE

Associate Editors

U. Y. MANE A. B. WALKE J. P. KOKANE

# CONTENTS


1. A Glance at Secularism in Indian Constitution / Dr. Sunil Shinde & Shekhar Ashtikar | 06
2. A Perspective on Fundamental Rights and Directive Principles in the Indian Constitution / Shekhar Ashtikar | 11
3. Human Rights Violation in the Light of Child Labor Practices in India / Sanket Shinde | 15
4. Women Rights in India: Constitutional Rights and Legal Rights / Kokane J. P. & Shinde S.Y. | 19
5. Children Rights: Constitutional Provisions / Shinde Sheela & Prakash Deshmukh | 24
6. Environmental Concern in Indian Constitution / J. P. Kokane & P. D. Mamadge | 30
7. The Provision of Water Management in the Constitution of India / Kishor N. Ingole | 33
8. Provisions in Indian Constitution for Paradhi Community in Scheduled Tribes ... / Pramod Gadekar | 38
9. Dr. B. R. Ambedkar's Contribution in the Empowerment of Women / Dr. Vandana S. Phatale | 43
10. भारतीय संविधान / प्रा. डॉ. कुलकर्णी व्ही. बी. | 45
11. भारतीय राज्यघटनेतील घटनादुरुस्ती ... / डॉ. कुचेकर एच्. एस. | 49
12. भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे तत्वज्ञान ... / प्रा. के. एम. गोलेकर | 58
13. भारतीय राज्यघटनेतील मूलभूत तत्त्वे / राजेंद्र सूर्यवंशी | 67
14. भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्वे / प्रा.डॉ.हरिभाऊ कदम | 73
15. भारतीय राज्यघटना निर्मिती - एक दृष्टिक्षेप / डॉ. मुक्ता सोमवंशी | 76
16. भारताच्या संविधानातील दलितांविषयी तरतुदी ... /डॉ. ज्योती व्हटकर | 81
17. भारतीय संविधानात अनुसूचित जाती ... / प्रा.बी.ए.साबळे | 87
18. भारतीय राज्यघटना दुरुस्ती व प्रक्रिया / प्रा. डॉ. आंधळे बी.व्ही. | 91
19. पहिली घटना दुरुस्ती ... / चालीकवार राजेश | 94
20. भारतीय राज्यघटनेतील भाषाविषयक तरतूदी / सचिन गिरी | 98
21. भारतीय संविधानातील महिला विषयक ... / डॉ.दत्ता मा. तंगलवाड | 106
22. भारतीय राज्यघटनेतील मूलभूत अधिकार ... / सचिन पोरे | 110
23. भारतीय राज्य घटनेवर प्रभाव टाकणारी व्यक्ती ... / सचिन डेंगळे | 115
24. भारतीय राज्य घटना व महिला शिक्षण ... / प्रा. वाळके अरुणा | 119




Late Ramesh Wa... College Son... Pin-43...


25. भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्क आणि ... / वैशाली शिंगणे | 125
26. भारतीय राज्यघटनेतील समानतेचा हक्क आणि ... / प्रा. सुनिता टेंगसे | 135
27. भारतीय राज्यघटना आणि माध्यम स्वातंत्र्य / प्राचार्य. विठ्ठल एडके | 145
28. भारतीय राज्य घटनेमधील महिला व .... / -प्रा. सौ. जाधव एस.बी. | 146
29. भारतीय राज्यघटनेद्वारा अभिप्रेत लोकशाही..... / डॉ.कुंभारीकर एन.एन. | 150
30. भारतीय राज्यघटनेमधील महिला ... / सुजाता हजारे | 155
31. भारतीय राज्यघटनेतील मुलभूत अधिकार व ... / सालमोटे महालिंग | 160
32. भारतीय राज्यघटना : उपेक्षित... / डॉ. मोहन चौगुले , नवनाथ कुचेकर | 164
33. भारतीय संविधान आणि उपेक्षित अनुसूचित जमाती / प्रा. चांगदेव मुंढे | 171
34. भारतीय राज्य घटनेतील मुलभुत अधिकार ... / प्रा.लोखंडे बी.बी. | 176
35. भारतीय राज्यघटनेतील मुलभूत हक्क / प्रा.डॉ. भगवान डोंगरे | 186
36. भारतीय राज्यघटनेतील मुलभूत अधिकार व.. / कल्पना साळुंके | 188
37. घटक राज्यांच्या निर्मितीत भाषांचे स्थान ... / रत्नमाला गोरे | 192
38. भारतीय राज्य घटनेतील मुलभूत अधिकार ... / शेळके जगदीश | 195
39. भारतीय संविधनाची वैशिष्टये / डॉ. जयदीप सोळूंके | 201
40. भारतीय राज्यघटनेतील मुलभूत अधिकार ... / राठोड दिलीप | 210
41. शाहू महाराजांच्या कल्याणकारी धोरणांचा ... / शिवशंकर कसबे | 216
42. भारतीय राज्यघटना-मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्वे / शिंदे अलका | 220
43. भारतीय राज्यघटनेतील दुर्बल घटकांच्या ... / प्रा. वितेश निकते | 226
44. मुलभूत अधिकारांची ऐतिहासिक पार्श्वभूमी ... / भालेराव सचिन | 229
45. भारतीय राज्यघटनेव्दारा प्रदत्त शिक्षणाचा ... / प्रा. शशिकांत परळकर | 236
46. भारतीय राज्यघटनेतील उपेक्षीत वर्गासाठीच्या ... / डॉ. मानवते उत्तम | 241
47. भारतीय संविधान : काही अनुत्तरीत प्रश्नं / डॉ. आनंद शिंदे | 245
48. भारतीय राज्य घटनेतील मूलभूत... / प्रा.ए.डी. मुंडे, प्रा.डी.बी.गायकवाड | 249
49. भारतीय राज्यघटनेवर बौध्द धम्माचा प्रभाव / जामकर ए.आर. | 254

## 15.

# भारतीय राज्यघटना निर्मिती - एक दृष्टिक्षेप

**डॉ. मुक्ता सोमवंशी (गंगणे)**
लोकप्रशासन विभाग प्रमुख, कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ जि.परभणी

प्राचीन कालखंडापासून वैभवशाली संस्कृतीचा वारसा मिळालेला भारत आज जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र म्हणून ओळखल्या जात आहे. हिंदू संस्कृती व बौध्दतत्वज्ञानानूसार प्राचीन काळापासूनच भारतात स्वातंत्र्य, समता व न्यायाचा विचार रुजलेला होता. भारत हा वैभवशाली त्याच बरोबर नैसर्गिक दृष्ट्या अतिशय संपन्न देश आल्यामुळे भारताकडे अनेक परकीय अकर्षित झाले. इंच, पोर्तुगाल, मुघल यांचे भारतात आगमन झाले. मुघलांनी आपले साम्राज्य भारतावर प्रस्थापीत केले. ब्रिटीशांनी व्यापाराच्या उद्देशाने ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना केली. परंतु अल्पावधितच ईस्टइंडिया कंपनीला शासनविषयक अधिकार प्राप्त झाले. ब्रिटिश पार्लमेंट व भारतातील राजाकडून मिळालेल्या अधिकारावर ईस्टईंडिया कंपनीची भारतावरील राजकीय सत्ता मजबूत झाली.

कंपनीला शासनाविषयक अधिकार प्राप्त होताच भारतात कायद्याने मुंबई, कलकत्ता व मद्रास या ठिकाणी नगरपालिकांची स्थापना करण्यात आली. या कायदेशीर प्रक्रियेपासूनच भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीला सुरुवात झाली, असे मत मांडले तर चुकीचे ठरणार नाही. कारण ब्रिटिश काळात भारताच्या दृष्टिने जे कायदे कंपनी किंवा ब्रिटिश संसदेकडून करण्यात आले. त्यांचा प्रभाव आपल्या राज्यघटनेवर पडला आहे. "सत्तेचा आरंभ, वाढ व संरक्षण या तीन उद्दिष्टांसाठी ईस्टइंडिया कंपनीने वेळोवेळी जे कायदे केले आणि आधुनिक पध्दतीने शासन व्यवस्था प्रस्थापित केली त्या सर्वांचा इतिहास म्हणजे भारताच्या राज्यघटनेचा इतिहास होय. हा घटनात्मक इतिहासाचा आरंभ होय."

**भारतीय राज्यघटनेवरील प्रभाव** :- भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीचा अभ्यास करीत असतांना तीन घटकांचा प्रभाव दिसून येतो.

- ब्रिटिश संसदेचे कायदे
- भारतीय संस्कृती
- निरनिराळ्या राज्यघटनेतील आदर्श

**ईस्ट इंडिया कंपनी व ब्रिटिश संसदेचे कायदे :-** भारतीय राज्यघटनेची निर्मिती करीत असतांना घटना समितीला भारताच्या ऐतिहासिक घडामोडिचा अभ्यास



करणे क्रमप्राप्त होते. कारण इतिहास हा भविष्यकालीन निर्णयासाठी मुलाधार असतो. त्यानूसार भारतीय घटनाकारांना ब्रिटिशांनी भारतीयांसाठी केलेल्या प्रत्येक कायद्याचा अभ्यास करणे गरजेचे होते. म्हणून ब्रिटिशकालीन सर्व कायद्यांना भारतीय राज्यघटनेत स्थान देण्यात आले आहे. त्यातील काही महत्वपूर्ण कायदे खालील प्रमाणे आहेत.

**१) १८३३ ची सनद** :- 'भारतीय राज्यघटनेच्या इतिहासात १८३३ ची सनद हा महत्वाचा टप्पा गणला जातो. कारण या सनदेने कंपनीच्या घटनेत तसेच भारताच्या राजकारभारात महत्वाचे बदल घडवून आले. कायदेपध्दतीत एकसूत्रीपणा आणण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलला देण्यात आला. त्यानुसार कायदामंत्र्याच्या अध्यक्षतेखाली एक भारतीय कमिशन स्थापन करण्यात आले. इंडियन पीनल कोड, सिव्हील प्रोसिजर व क्रिमिनल प्रोसिजन कोड हे कायदेविषयक ग्रंथ तयार करण्यात आले. या कायद्याचे वेशिष्ट्य म्हणजे या कायद्यांची चौकट भारतात अद्यापही रुढ आहे.' [२]

**२) १८५३ ची सनद** :- १८३३ च्या सनदेप्रमाणेच ही सनदही भारताच्या राज्यघटनेच्या दृष्टिने अत्यंत महत्वाची आहे. कारण या कायद्यानेच भारतात कायदेमंडळाची सुरुवात झाली. संसदीय लोकशाहीच एक अवश्यक अंग म्हणजे स्वतंत्र कायदेमंडळ यावेळी स्थापन करण्यात आले नसले तरी अल्पप्रमाणात का होईन त्याची सुरुवात झाली.

**३) १८५८ चा कायदा** :- १८५८ च्या कायद्याने दुहेरी राजवट संपूष्टात येऊन भारताचा कारभार प्रत्यक्षरीत्या पार्लमेंट कडुन ब्रिटिश राजपदाच्या नावे करण्याची घोषणा करण्यात आली.

४) इंडियन कौंन्सिल अॅक्ट १८६१ या कायद्यामुळे हिंदी लोकांना प्रथमच कार्यमंडळाचे सदस्यत्व प्राप्त झाले. कायदे करण्याच्या कामात काही प्रमाणात भारतीय सदस्यांचे सहकार्य घेण्याचा प्रयत्न झाला. या कायद्याने प्रांतिक कायदेमंडळाची निर्मिती झाली.

५) १९१९ चा कायदा ( सुधारणा कायदा ) :- '१९१९ च्या सुधारण कायद्यानुसार प्रथमच भारतातमध्ये केंद्रात द्विग्रह सभाग्रहाची व्यवस्था भारतीय घटकारांनी विद्यमान राज्यघटनेत स्वीकारली आहे.' [३]

६) १९३५ चा कायदा :- १९३५ चा कायदा भारत प्रशासन कायदा म्हणून ओळखला जातो. या कायद्यानुसार भारतात संघराज्याची निर्मिती करण्यात आली. भारतीय राज्यघटनेच्या दृष्टिने हा कायदा महत्वाचा आहे. या कायद्यामध्ये ३२१

कलमे व १९ परिशिष्ट्ये होती. या कायद्यानुसार भारतात संघराज्याची निर्मि करण्यासाठी अधिकराची विभागणी संघसूची, समवर्ती सूची व प्रांतसूची अ करण्यात आली. केंद्रस्थानी द्विगृहात्मक कायदेमंडळ पध्दतीचा स्वीकार के तसेच संघन्यासालयाची स्थापना या कायद्यानुसार करण्यात आली. भारतीय राज्यघटनेवर १९३५ च्या कायद्याचा प्रभाव बहुअंशी दिसून येतो.

याचबरोबर क्रिप्स योजना, त्रिमंत्री योजना, लॉर्ड माऊंटबॅटन योजना व भारताच्या स्वातंत्र्याचा कायदा यांचाही भारतीय राज्यघटनेवर प्रभाव पडलेला आहे.

**भारतीय संस्कृती :-** 'भारताला ५००० वर्षाची संस्कृती व गौरवशाली परंपरा लाभलेली आहे. अशा या समृध्द गौरवशाली इतिहासाचा प्रभाव आपल्या संविधानावर पडणे साहजिक आहे. त्यातूनच आपल्या देशाचे राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज व राष्ट्र्ध्वज व राष्ट्रिय मानचिन्हे निर्माण झालेली आहेत. जी आपल्या संस्कृतीचे प्रतिक आहेत.'

अशोक स्तंभावरील चार सिंहाचे तोंड असलेल्या स्तंभास आपण राष्ट्रचिन्ह म्हणून मान्यता दिलेली आहे. भारतीय संस्कृतिचे प्रतिक म्हणून सम्राट अशोकाकडे पाहिले जाते. त्यांनी बौध्दधर्माचा स्विकार करुन शांततेचा संदेश जगभर पसरविण्यासाठी धम्मचक्र परिवर्तन केले आहे. त्यांच्या विचारांचा प्रभाव आपल्या आतंरराष्ट्रीय धोरणावर पडलेला दिसून येतो.आपला भारत हा विविधतेने नटलेला आहे. येथे अनेक भाषा, धर्म, वंश असलेले लोक राहतात. त्यांना एकाधाग्यात गुंफून राष्ट्रीय एकात्मता निर्माण करणारे जण गन मन हे आपले राष्ट्रगीत अनेकातून एकात्मतेचे दर्शन घडविते. तसेच राष्ट्रीय प्राणी वाघ, राष्ट्रीय पक्षी मोर, राष्ट्रीय फुल कमळ स्वीकारण्यात आले आहे.

**निरनिराळ्या देशातील आदर्श :-** भारतीय घटनाकारांनी संविधान निर्मितीच्या वेळी विविध राष्ट्रांच्या राज्यघटनांचा अभ्यास केला. त्याच बरोबर तेथील सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय परिस्थितीचा अभ्यास केला. जगातील काही उत्कृष्ट राज्यघटनामधुन काही गोष्टींचा स्वीकार केला. हे स्वीकारत असताना हि तत्वे अथवा कायदे आपल्या देशातील सर्व परिस्थितीस अनुकूल आहेत किंवा नाही याचा पूर्ण विचार केला. आपण संसदीय लोकशाहीचा अंगीकार केला. कारण ब्रिटिशांनी भारतावर दिडशे वर्ष राज्य केले ते भारतीयांच्या अंगवळणी पडले होते. यामुळे आपण संसद, नामधारी राष्ट्रप्रमुख, पंतप्रधान, मंत्रीमंडळाची सामुहिक जबाबदारी ही तत्वे इंग्लडच्या राज्य घटनेतून घेतली आहेत.

'अमेरिकन राज्यघटनेतून लिखित राज्यघटना, उद्देश पत्रिका, मुलभूत अधिकार, संघराज्य पध्दती, न्यायालयीन पुर्नविलोकन अशा संकल्पना घेतल्या आहेत.'५ या



संकल्पनांचा स्विकार करित असताना. त्या आपल्या देशातील परिस्थितीला अनुकूल ठरतील अशाच गोष्टिचा स्विकार केला आहे. संविधानातील राज्याचे मार्गदर्शनपर तत्वे आयर्लंडच्या राज्यघटनेतून स्विकारली आहेत. केंद्र व घटकराज्य सत्तेची विभागणी ही कॅनडाच्या संघराज्यपध्दतीवर अधारीत आहे. आस्ट्रेलियन संविधानातून समवर्ती सुचिचा स्विकार केला तर दक्षिण अफ्रिकेच्या संविधानावर अधारित घटना दुरुस्तितीची पध्दत स्विकारण्यात आली आहे. आणीबाणी विषयक तरतुदिचा जर्मन संविधानातून स्विकार करण्यात आला.

वरिल प्रमाणे ब्रिटिश कालीन कायदे, भारतीय संस्कृती व जगातील उत्कृष्ट राज्यघटनांचा अभ्यास करुन भारतीय संविधान निर्माण करण्यात आले आहे.

घटना समिती :- प्रांतीय विधीमंडळाच्या सदस्यांनी घटनापरिषद (समिती) चे सदस्य निवडुन दिले. घटना समितीतील सदस्यांची एकून संख्या २९६ होती. ९ डिसें १९४६ घटनासमितीची पहिली बैठक झाली. डॉ. राजेंद्रप्रसाद यांची अध्यक्ष म्हणून नियूक्ती झाली. डॉ. बाबासाहेब अंबेडकरांना दुस-यांदा घटना समितीवर निवडून दिले. ३० ऑगस्ट १९४७ घटना परिषदेने घटनेचा मसूदा तयार करण्यासाठी डॉ. बाबासाहेब अंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यांची समिती स्थापन केली. या समितीमध्ये गोपालस्वामी अय्यंगार, कृष्ण स्वामी अय्यर, के.के. मुन्सी, मोहमद सादुल्ला, बि.पी.खेतान व एन.माधवराव यांचा समावेश होता. दोन वर्ष आकरा महिने आठरा दिवसात घटनापरिषदेच्या बैठकीची आकरा सत्रे झाली. तर घटनेच्या मसूद्यावर ११४ दिवस चर्चा झाली. २६ नोव्हें १९४९ रोजी भारतीय संविधानांचा स्विकार करण्यात आला.

घटना परिषदेद्वारे तयार करण्यात आलेले संविधान भारतातील प्रत्येक व्यक्तिला आपले वाटावे, प्रत्येक नागरीक संविधानास बांधील राहिल यासाठी संविधातील उद्देश पत्रिका अथवा सरनामा फार महत्वाचा आहे.

सर नाम्याची सुरूवातच 'आम्ही भारतीय लोक' अशी करण्यात आल्यामुळे राज्यघटनेप्रती भारतीय लोकांचा आदर निश्चित होऊन त्यांची जबाबदारी वाढविण्याचा प्रयत्न सफल झाला आहे. तसेच संपूर्ण राज्यघटनेचे प्रतिबिंब उद्देश पत्रिकेत दिसून येते. राज्यघटनेतील प्रत्येक कलम विचारपूर्वक लिहिले असल्यामुळे भारतीय राज्यघटनेस सात दशक पूर्ण होत आहेत. भारताने या कालखंडात विविध क्षेत्रात प्रगती केली आहे. डॉ. बाबासाहेब अंबेडकरांनी संविधान सादर करित असताना काढलेले उद्गार फार महत्वाचे वाटतात.

डॉ. बाबासाहेब अंबेडकर व घटनापरिषदेतील इतर सदस्यांनी मिळून ही राज्यघटना तयार केली आहे. या राज्यघटनेवर काही आक्षेप घेतले जातात.

त्यातील एक महत्वाचा आक्षेप म्हणजे या घटनापरिषदेमध्ये देशातील सामान्य जनतेला प्रतिनिधीत्व मिळालेले नाही. परंतू डॉ. बाबासाहेब अंबेडकर हे सामान्य नव्हेतर अतिसामान्य व्यक्तिंचा विचार करणारे नेते होते. कायद्याचा गाढा अभ्यास, समता, स्वातंत्र्य व न्याय हि तत्वे त्यांच्या रोमारोमात संचारली होती. त्यामुळे सामान्यांना प्रतिनिधीत्व मिळाले नाही असा आक्षेप घेणे चुकिचे आहे.

उपरोक्त मांडण्यात आलेल्या महितीच्या आधारे असे स्पष्ट होते की, भारतीय घटनाकारांनी भारताच्या सर्वांगीन अभ्यासातून तसेच जगातील उत्कृष्ट राष्ट्रांच्या राज्यघटनेचा अभ्यास करुन भारतासाठी एक उत्कृष्ट संविधान देण्याचा खूप उत्तम प्रयत्न केला आहे. या शोधनिबंधाचे गृहितकृत्ये भारतीय संविधान हे जगातील उत्कृष्ट राज्यघटना व भारतीय समाजाच्या सर्वांगीण अभ्यासातून निर्माण झालेली आहे. हे सत्य सिध्द झाले आहे.

**निष्कर्ष व समारोप :-** दिडशे वर्ष ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली असलेल्या व प्रत्येक बाबतीत विविधता असलेल्या देशासाठी एकसंघ राज्यघटना निर्माण करणे तसे फार मोठे आव्हान घटनापरिषदे समोर होते. परंतू भारतीय घटना- कारांनी हे आव्हान दोन वर्ष आकरा महिने आठरा दिवसात पुर्ण करुन भारताला एक राष्ट्रनिर्माण करण्यासाठी उत्तम संविधान निर्माण केले. आपल्या संविधान सभेमध्ये अनेक सदस्य होते. त्यांनी राज्यघटना निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. परंतू मसूदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान निर्मितीमध्ये अधिक कष्ट घेतले प्रत्येक कलमावर सखोल विचार केला. त्यामुळे आजही आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणूनच ओळखतो. जगातील महान विचारवंतापैकी एक असलेली नव्हे तर जगातील दहा बुध्दीमान व्यक्तिमधील पहिल्या क्रमांकावर असलेल्या व्यक्तिचा प्रभाव भारतीय राज्यघटनेवर असल्यामुळे आपली राज्यघटना सत्तर वर्षाची होत आहे.

**संदर्भ :-**


१. डॉ. रा.श्री.मोरवंचीकर : अधुनिक भारत, विद्याबुक पब्लीशर्स, औरंगाबाद पृ.क्र.१८५
२. उपरोक्त पृ.क्र. १९०
३. पाटील व इतर : भारतीय गणराज्याचे शासन व राजकारण, विद्याबुक पब्लीशर्स, औरंगाबाद पृ.क्र.०७
४. प्रा.डॉ. विजयकुमार गो. कुलकर्णी : भारतीय संविधान शासन आणि राजकारण, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद पृ.क्र.१८
५. डॉ. मंजिरी कारेकर व डॉ. सुवर्णा बेनके : भारताचे शासन आणि राजकारणय, पिअरसन, दिल्ली. पृ.क्र.६


Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani



PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani